

## मेघदूता दे निरोप मत्प्रियेला. . .

*एक स्वैर रूपांतर*

ह्या प्रथम दिनी आषाढाच्या
पाही तुला रे सावळया घना
रामगिरीवर विरहात प्रियेच्या
मी काळ कंठितो तिच्याविना

इंद्रनील तू करसी सिंचन
कारुण्याचे शिंपीत जीवन
तापितांचे तू शांतवन
विनंतीरूप तुज हे मम वंदन

दे निरोप मेघा मत्प्रियेला
दूर जाऊनी अलकानगरी
म्हणू नको रे नाही मजला
सरुनी जाता अधांतरी

स्थीर रहा सांगतो तुला
वनवास मज कैसा घडला
शाप कुणाचा हा जडला
प्रमाद कसला मी केला

कुबेर राजा भक्त शिवाचा
दिवसारंभी नेम तयाचा
गुच्छ सुगंधीत नवपद्मांचा
शंकरास अर्पण्याचा
कुबेरस्वामींचा मी सेवक
भल्या पंहाटे तोडून आणी
सोनेरी कमलांस अनेक
अन् पूजनासाठी ठेवी बांधुनी

परी प्रातःसमयी सोडवेना
मज नववधूच्या आलिंगना
म्हणून कमळे ठेविली तोडुनी
संध्या सरता आधिल्या दिनी

कळता ही क्लृप्ती कुबेर कोपला
वर्षशाप अन् देता वदला
केल्या पापाच्या शमनाला
भोग प्रियेच्या तू विरहाला

मी भोगीत आहे वर्षभरी
कुबेर स्वामींची शिक्षा
आठ मास रामगिरीवरी
ना कुणी भेटले ह्या यक्षा

मित्रबंधूसम मेघदूता
ने निरोप माझा प्रेयसीला
कुटजपुष्पे तुला वाहता
व्याकूळलो रे विनविता

अलकानगरीत कुबेर राही
उत्तरेस त्याच्या माझे सदन
दुरूनीही तुज दारावरले
दिसेल इंद्रधनुचे तोरण

असे अंगणी मंदार उभा
वृक्ष प्रफुल्लीत लवलेला
मत्प्रियेने प्रेमे ममतेने

आहे त्याला वाढविला
वैदूर्याच्या देठीं फुललेली
सुवर्णकमळे वापीस व्यापिती
रत्नजडीत तिच्या पाय-या
जलात उतरत चकाकती
जलतरंगी त्या हंस विहरती
अनुपम आनंदे रमती
जाऊ नकोस जवळी त्यांच्या
जरी न ते कोणा भीती

इंद्रनील अन् शाल घालुनी
तिथे टेकडी नभी शिरे
सोनफुलांच्या वेणीतून वरती
वैभव ती प्रसवीत मिरे
मम प्रियेला प्रीय असे ती
तुला पाहता आठविते
तुझ्यासम ती नभा स्पर्शिते
पाचूंसम ती चकाकते
सांवरून तव गजदेहाला
अलगद खाली ऊतरू दे
लुकलुकणा-या विजेस तव अन्
काजव्यांसवे विहरू दे

अशोक तेथे गुलाल उधळीत
हलवी पाने अंगावरली
केसर तरुच्या अंगलटीला
माधवी वेल असे जडली
माझ्यासम ती वाट पाहते
बाहेर मत्प्रीया येण्याची
डाव्या पायवरती लवुनी
चूळ फेंकण्या मद्याची

ऐशा सुंदर पार्श्वभूमीवर
अंगणातल्या स्फटिकशिलेवर
झुलते यष्टी, तिच्या मुळाना
लाभे पाचूंचा आधार
तिथेच देते पाळीव मयुरा
मत्प्रिया नृत्याची शिकवण
ताल उमटता टाळीवरती
कंकणी जणू वाजे पैजण

प्रवेश करता दारी दिसतील
शंख - पद्मरूप चित्रखुणा
चिंतनात तव ठेव तयाना
तिथे जाता ओळखण्या
घरात स्वामी त्या नसल्याने
भासेल तेथे विषण्णता
का उघडावे मूख पद्माने
रवी संध्येला मावळता?

कृश कंबरी रुतल्या नाभी
दर्शवी तनू आकार निमूळता
दातांवर अधरी, पिके तोंडले
भासे मृगनयना ती चकिता
भरीव नितंबी मंद चालता
भाराने स्तन थोडे लवती
वाटे जणू ती पहिलीवहिली
स्त्रीरूपाची जगी निर्मिती

प्रती प्राण ती आहे माझा
ऐकशील तू तिचा हुंदका
विव्हल नाद वलयाना निर्मीत
असेल थकवीत डोही बदका

एकाकी जीवनास कंठता
जाईल रे ती पुरती खचुनी
शिशिराचा वायू असह्य होता
टिकेल कैसी जली कमलिनी?

नेत्र तिचे रे असतील सुजले
दीर्घ ऊरीच्या आकांताने
रंग तिच्या अन् ओठांवरले
फिकट होतील दुःखाने

हातावरती वदन टेकता
असेल केशी मुख दडलेले
जणू मेघाने जाणून व्यथेला
चंद्रबिंब अर्धे लपविले

देवघरातील देवांच्या ती
असेल गुंतली पुजाअर्चनी
रंगवीतही असेल माझी
विरहकृश प्रतिमेस मनी
पिंज-यातल्या मैनेला अन्
विचारेल ती आर्जवुनी
आठवतो का प्रियकर माझा
होतीस तू ही त्याची सजणी

मांडीवरल्या मळलेल्या वस्त्री
वीणा छेडिता दिसेल ती
कवनी माझे नाम घेऊनी
थकेल ती ते आळविता
नयनामधली आसव ओघळ
पडेल टिपटिप वीणेवरती
घेतियलेल्या आरोहाला
अवरोही हरवेल स्मृती

फुलाकळयांच्या रांगोळीवर
शेज उद्याची मनात सजवीत,
विरहफुलांचे देंठ तोडुनी
विरहमास उरलेले मोजीत,
रात्रदिनी ती असेल कल्पीत
स्वप्न आमुच्या मिलनाचे
विरहिनी रे अशाच रमती
खेळ दुजा ना तयां सुचे

दिवस फार तिज नसेल जाचत
गृहकामी ती राहील गुंतत

परी माझ्याविण रात्र कुशीची
कशी बरे ती असेल सारीत?
माडीवरल्या खिडकीजवळी
रात्रीला तू भेट तिला
निद्रेवीण ती असता जागी
दे निरोप हा मत्प्रियेला

विरहाच्या शयनी उष्ण आसवें
रात्रभरी ती असेल गाळीत
अर्ध्या शय्येवरती विव्हळत
चंद्रकलेसम असेल वितळत
मत्स्य विहरता मनीच्या डोही
पद्मफूल ते पडे निळे
निद्रेवीण नच स्वप्नी तिजला
पतीमिलनाचे सूख मिळे

दुर्मिळ नीज जर तिला लाभली
थांब तिथे त्या वेळेला
स्वप्नी माझ्या मिठीत शिरता
लगेच येईल जाग तिला
मग झुळकेवर दंव फुंकारून
विखूर मालती गंधाला
सांग तिला तू मित्र सख्याचा
आलास निरोप देण्याला

मरुतासम तुज गगनी पाहून
तुजला वाकून करेल वंदन
श्रवण करिता संदेशाला
ते मिलनासम भासेल निवेदन

सांग तिला, “मी रामगिरीवर
स्वप्नात तुझा गे संग शोधितो
शापकाळ हा संपत येता
मनात मीही व्याकूळतो

मृगनयना तू चंद्रमुखी
केशभार तव मयूर पिसारा
मधूर गंधीत गे तव कांती
खळखळ वाहे तव प्रीतझरा
अतृप्ती माझ्या, आरक्ता तू
मम प्रीतीची संवेदना
शिंपडती गे स्वप्नप-या
अत्तरास अपुल्या मिलना

वृद्धिंगत गे प्रेम होतसे
विरहाचे त्यावर पडता बंधन
ऋतुचक्रावर सुखदुःखाच्या
प्रणयाचे विरही चढते तोरण
एकटीच तू अससी तेथे
एकटाच मी असे इथे
चार मास हे असेच सरता
विसरून जाऊ विरहव्यथे "

निरोप हा देऊन प्रियेला
आण तिचा संदेश मला
सुमनांमधला सुगंध तिथला
घेऊन ये तू सोबतीला
तुझिया भ्रमणी वियोगात तव
नच पडो कधीही विद्युलता
आशीर हा मी देतो तुजला,
जा अलकानगरी मेघदुता . . .

भेट शब्दांतली, . . .

उरलेत त्यांतल्या, ह्या वर्षाची.
शब्दांमधल्या मधूर प्राशना . . .

विजय पाठारे

एकवीस जुलै, दोनहजार चार